नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २३/०६/२०२५ (सोमवार)

---

## अवैधरित्या देशी, मोहाफुल दारू बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई,७ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद एकुण २२,३७०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २२/०६/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन उमरेड, भिवापुर, जलालखेडा , खापा, सावनेर अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू,मोहाफुल दारू,मोहाफुल सडवा असा एकुण २२,३७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत **३ महीला आरोपीतांवर** ३ गुन्हे नोद आहे. पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत आरोपी नामे **गजानन देवराव मुरकुटे, वय ४५ वर्षे, रा. विरखंडी,ता. भिवापूर जि. नागपूर** याचेवर ,पोलीस स्टेशन जलालखेडा येथे **लिलाधर गोंविदराव राउत वय ३१ वर्षे, रा वार्ड क्र ०१,रोहना, ता. नरखेड,जि. नागपुर** याचेवर, पोलीस स्टेशन खापा येथे **संतोष भारत उईके वय ३५ वर्ष रा.कोथुर्णा ता. सावनेर** आणि ,पोलीस स्टेशन सावनेर येथे एका महीला आरोपीवर अशा एकुण ७ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ७ गुन्हे दाखल केले आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने